


स. प. महाविद्यालय मैदान : अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने शरद पवार यांचा सत्कार करताना नवमहाराष्ट्र संघाचे पदाधिकारी. या वेळी उपस्थित दत्तात्रेय धनकवडे, रामराजे नाईक निंबाळकर.

# 'खो-खो'चा लौकिक राज्याने राखला

## अमृतमहोत्सवी सत्कार सोहळ्यात शरद पवार यांचे प्रतिपादन

**पुणे, ता. २१ :** "कबड्डी, खो-खो यांसारखे मैदानी खेळ पाहताना जो आनंद मिळतो तो अन्य खेळांमध्ये मिळत नाही. खो-खो हा चपळ खेळ असून, त्याची भारतामध्ये प्रगती झाली पाहिजे. दिवंगत शंकरराव पाटणकर यांनी खो-खो या खेळासाठी आयुष्य वाहून घेतले होते. त्यांनीच स्थापन केलेल्या नवमहाराष्ट्र संघाने खेळाडू घडविण्याची परंपरा जपली आहे. महाराष्ट्रानें या खेळाचा नावलौकिक कायम ठेवला", असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले.

नवमहाराष्ट्र संघाने शरद पवार यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून अखिल भारतीय निमंत्रित खो-खो स्पर्धा भरविली आहे. त्यानिमित्ताने पवार यांचा खास सत्कार करण्यात आला. महापौर दत्तात्रय धनकवडे, विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर, पालकमंत्री गिरीश बापट, माजी आमदार रमेश थोरात, स्थायी समिती अध्यक्ष अश्विनी कदम, पालिकेचे सभागृह नेते बंडू केमसे, विनायक रासकर, रामकुमार राठी, गोपाळ म्हस्के; तसेच संघाचे सुरेश दिनकर, अरविंद पटवर्धन व पदाधिकारी उपस्थित होते.

पवार म्हणाले, "मी १९७२ मध्ये बारामतीत राष्ट्रीय खो-खो स्पर्धा भरविली होती. त्या वेळी सतीश देसाई व श्रीरंग इनामदार यांनी महाराष्ट्र संघाला यश मिळवून दिल्याचे आठवते. पुढे इनामदार यांना अर्जुन पुरस्कार मिळाला. खरे पाहता या खेळाला एकप्रकारे प्रोत्साहन मिळाले."